जागतिकीकरणातला राष्ट्रवाद

राजेंद्र व्होरा

जागतिकीकरणाच्या नावाखाली चाललेल्या जागतिक स्पर्धेत अमेरिका, जपान, जर्मनी यांची मक्तेदारी आकार घेते आहे. त्यांच्यात आपापसात थोडी स्पर्धा असू शकते पण सर्वांना त्या स्पर्धेत उतरण्यास वाव नाही. ज्यामुळे पर्यावरण बिघडेल, आरोग्यास धोका निर्माण होईल, घाण, दुर्गंधी होईल असे कारखाने गरीब देशांमध्ये उघडणे म्हणजे जागतिकीकरण. श्रीमंत देशातील औद्योगिक कचरा व टाकावू वस्तूंचे डोंगर गरीब देशात आणून टाकणे म्हणजे जागतिकीकरण. एनरॉन कंपनीच्या बाईंनी शरद पवार, बाळासाहेब ठाकरे, गोपीनाथ मुंडे यांच्यावर सारखाच प्रभाव टाकणे म्हणजे जागतिकीकरण.

विसाव्या शतकातील या शेवटच्या दशकातील सर्वात महत्वाची व परिणामकारक घटना कोणती असा जर प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर निश्चितच जागतिकीकरण असे द्यावे लागेल. अखिल मानवजातीवर प्रभाव टाकणारी, मानवाच्या जीवन पद्धतीत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणारी आणि त्याच्या संस्कृतीस नवे परिमाण देणारी एवढी व्यापक प्रक्रिया दुसरी कोणतीही नसेल. राष्ट्रा-राष्ट्रांच्या, समाजा-समाजांच्या व जातीजमातींच्या तसेच भाषेच्या सीमारेषा छेदून जाणारी जागतिकीकरणाची ही लाट आपल्या वाटेत येणाऱ्या लहान-मोठ्या घटकांना गिळंकृत करीत आहे. त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्था, जागतिक संस्कृती किंवा जागतिक राज्यसंस्था या शब्दांना अर्थ प्राप्त होतो आहे, तर स्थळ व काळ या संकल्पना निरर्थक बनू लागल्या आहेत. राष्ट्र-राज्य, सार्वभौमत्व, राष्ट्रवाद, देशभक्ती, स्वदेशी, स्वयंपूर्णता, देशाची स्वायत्तता यासारख्या गोष्टींना, संज्ञाना इतिहासजमा होण्याचा धोका निर्माण झाला आहे. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात राष्ट्राच्या सार्वभौमत्वाची चर्चा करण्याची वेळ आपल्यावर आली आहे. असंख्य लोकांच्या त्यागातून उभे राहिलेले हे राष्ट्र आपण गेल्या अर्धशतकात सर्व संकटांवर मात करून टिकवून ठेवले आहे. पण आता जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये आगामी काळात मात्र आपल्यासारख्या देशांच्या सार्वभौमत्वावर बऱ्याच मर्यादा पडणार अशी लक्षणे दिसत आहेत.

सार्वभौमत्वावरील मर्यादा :

अर्थकारणाने देशाच्या सीमारेषा पूर्वीच ओलांडल्या होत्या. पण आज या जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये परिणामकारकपणे हस्तक्षेप करणे सार्वभौम सरकारला कठीण होऊन बसले आहे. याउलट बहुराष्ट्रीय कंपन्या मात्र त्यावर वर्चस्व गाजवू लागल्या आहेत. या कंपन्यांच्या कारवायांवर नियंत्रण घालणे आपल्यासारख्या देशांना अवघड झाले आहे. शेअरबाजारही जागतिक बनला आहे. त्यावर प्रभाव टाकणे किंवा त्यात हस्तक्षेप करणे गरीब देशांना शक्य होत नाही. उपग्रहाद्वारे होणाऱ्या संदेशवहनास प्रतिबंध घालणे हे राज्यसंस्थेस शक्य नाही. पर्यावरणाच्या प्रश्नांनी वैश्विक रूप धारण केले आहे. त्याला आपल्या कक्षेत आणणे कोणत्याही देशाच्या सरकारला झेपणारे नाही. गणकयंत्रामार्फत जी माहिती, जे संशोधन किंवा आकडेवारी संक्रमित होते आहे तेही सरकारच्या कक्षेबाहेर जाणारे आहे. दूरध्वनी, दूरसंचार यामार्फत होणाऱ्या संचरणास नियंत्रण करणे राज्यसंस्थेस जमणारे नाही. त्याचे तंत्रज्ञान इतके पुढे गेले आहे की त्याला आळा घालणे सार्वभौम सत्तेस जमत नाही. संपर्क माध्यमांनी जे जागतिक परिमाण अंगीकारले आहे त्यामुळे शिक्षण व भाषा या घटकांवरील राज्यसत्तेचा प्रभाव कमी कमी होऊ लागला आहे. शिक्षण व भाषेला देशाच्या सीमारेषा थोपवू शकत नाहीत. परदेशांतील बँकांत असणाऱ्या प्रचंड ठेवी, इलेक्ट्रॉनिक माध्यमातून होणारी पैशाची मोठ्या प्रमाणावरील अदला-बदल यामुळे विनिमयावरील राज्यसंस्थेची मालकी मर्यादित होत आहे. जागतिक पातळीवर भांडवलाची होणारी उलाढाल, दूरसंचारामार्फत होणारे संदेशवहन, हवाई वाहतुकीचे वाढलेले प्रमाण यामुळे जगातील मोठ-मोठी शहरे एकमेकांशी सहज संपर्क साधू शकत आहेत. त्यांच्या देशातील अंतर्गत भागापेक्षा त्यांचा परदेशातील शहरांशी जास्त संबंध प्रस्थापित होत आहे. स्वतःच्या देशाच्या केंद्र सरकारला विचारात न घेता घटकराज्याची सरकारे इतर देशांतील घटकराज्यांशी व्यापारी व आर्थिक संबंध साधू लागले आहेत. त्यामुळे केंद्र सरकारच्या सत्तेला धक्का बसू लागलाय. देशांच्या सीमारेषा ओलांडून जाणारे परस्परसंबंध निर्माण होण्याची प्रक्रिया सध्या दृष्टीस पडते. स्त्रीवादी चळवळ किंवा पर्यावरणीय आंदोलनात हे प्रभावीपणे घडताना दिसते. व्यवस्थापकांचा वर्ग बहुराष्ट्रीय दृष्टीने विचार करताना तसेच स्वतःच्या वर्गाचे संबंध जोडताना देशांच्या सीमांचा विचार करणे गरजेचे मानत नाही. संगणक यंत्रामार्फत एकमेकांशी सतत संपर्क साधणाऱ्यांचेही बहुद्देशीय गट निर्माण झाले आहेत. इंटरनेटमार्फत हे घडते आहे. राष्ट्राच्या सार्वभौमत्वापेक्षा मानवी हक्क, पर्यावरण या गोष्टींना जास्त महत्व प्राप्त होते आहे.

जगाच्या वेगवेगळ्या भूप्रदेशांतील, खंडांतील देश युरोपीयन युनीयनप्रमाणे एका संघटनेचे सभासद होताना आपण पाहतो आहोत. ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक कोऑपरेशन अँड डेव्हलपमेंट या संघटनेचे २९ पुढारलेले देश सभासद आहेत. जी-७ याचे सात श्रीमंत देश सभासद आहेत. गॅटचे १२२ देश सभासद होते, ते आता वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशनचे (१९९५) सभासद झाले आहेत. आय.एम.एफ. चे १८२ देश सभासद आहेत. इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ सेक्युरिटीज कमिशन्स या संस्थेचे ६९ देशांतील ११५ सेक्युरिटीज कमिशन्स सभासद आहेत. वर्ल्ड बँक तर आहेच आहे. मुद्दा असा आहे की या आंतरराष्ट्रीय संस्था सभासद देशांच्या आर्थिक

Scanned by CamScanner

धोरणावर जबरदस्त प्रभाव टाकतात. बऱ्याच देशांच्या अर्थमंत्रालयावर त्यांची देखरेख असते. फोर्ड फाऊंडेशन, सारोस फाऊंडेशन या सारख्या संस्थांही आपापल्या परीने बऱ्याच देशांच्या कारभारात हस्तक्षेप करीत असतात हे आपण जाणतोच. सामाजिक चळवळींनीही आंतरराष्ट्रीय रूप घेतले आहे. त्यात आदिवासींच्या, एतद्देशीयांच्या चळवळी, स्त्रीवादी, पर्यायी विकास, ग्रीनपीस, एड्सविरोधी चळवळ इत्यादींचा समावेश होतो. परदेशी गुंतवणूक जगात पूर्वी (१९६० साली) ६६ बिलियन डॉलर्स होती. ती १९९५ साली झाली, २६०० बिलियन. निर्यात १९५० साली ४३० बिलियन डॉलर्सची होत असे. ती आता १९९५ साली ६००० बिलियन डॉलर्सची होत आहे. परदेशात स्थायिक झालेल्यांकडून ठेवल्या जाणाऱ्या ठेवी फक्त २० बिलियन डॉलर्स इतक्या होत्या १९६४ साली. त्या १९९५ साली ७८७६ बिलियन डॉलर्स इतक्या वाढल्या आहेत. यावरून आपल्या लक्षात येईल की जागतिकीकरणाची प्रक्रिया किती व्यापक परिणामकारक बनते आहे. आणि आपण तर १९९५ ची आकडेवारी पाहिली आहे. आजमितीला हे प्रकरण पुढच्या टप्प्यावर गेलेले असणार.

जागतिकीकरणावरील आक्षेप

सार्वभौमत्वाला, स्वायत्ततेला धक्का लावणाऱ्या या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेवर राष्ट्रवादी किंवा समतावादी दृष्टीकोनातून टीका केली तर जागतिकीकरणाच्या पुरस्कर्त्यांना किंवा ही प्रक्रिया अपरिहार्य आहे असे मानणाऱ्या लोकांना हसू येते. ते म्हणतात की हे टीकाकार जुन्या कारणांना कवटाळून बसले आहेत. त्यांना जग कुठे चालले आहे हे माहीत नाही. म्हणून अमेरिका व युरोप खंडात या जागतिकीकरणावर कोणते आक्षेप घेतले जात आहेत याचीच नोंद प्रथम करू या. (१) खऱ्या अर्थाने बहुराष्ट्रीय कंपन्या तुलनेने फार कमी आहेत. एखाद्या राष्ट्रातील कंपनीच आंतरराष्ट्रीय व्यापार किंवा उद्योगधंदा करीत असते. म्हणजे त्या कंपनीचे आर्थिक साम्राज्य सर्वत्र पसरलेले असते व त्यास आपण जागतिकीकरण म्हणतो. (२) वित्तीय किंवा औद्योगिक भांडवलाचे संक्रमण विकसित जगातून अविकसित देशाकडे फारसे होत नाही. त्यामुळे जागतिकीकरणाचा फायदा गरीब देशांना होतो का असा प्रश्न आहे. (३) प्रत्यक्ष गुंतवणूक विकसित जगातील देशात केंद्रित झाली आहे. (४) खरे तर जगाची अर्थव्यवस्था ही जागतिक नाहीच. व्यापार, गुंतवणूक, भांडवलाची देवाणघेवाण या गोष्टी युरोप, उत्तर अमेरिका आणि जपान हे तीन गट जगाच्या बाजारपेठेचे नियंत्रण करतात. (५) खुल्या धोरणाच्या नावाखाली जागतिकीकरणात गरीब देशांचे जास्त परिणामकारकपणे शोषण होते आहे. (६) आर्थिकदृष्ट्या दुभंगलेल्या जगात भांडवलशाहीचा



टंका पिटविण्याचा हा प्रकार आहे. जागतिकीकरणाशी निगडीत असलेले तंत्रज्ञान श्रीमंत देशांनाच फायद्याचे ठरते असा अनुभव आहे. (७) जागतिकीकरणामुळे गर्दचा व्यापार, अतिरेक्यांची चळवळ चालविणे जास्त सोपे जाते. (८) आय.बी.एम. किंवा शेल सारख्या कंपन्यांवर लोकशाही मार्गाने कायदेमंडळामार्फत नियंत्रण घालणे शक्य होत नाही, इतक्या त्या ताकदवान बनल्या आहेत. (९) जागतिकीकरण ही पाश्चिमात्य भांडवलशाहीची नवी अवस्था आहे. हे सर्व आक्षेप जागतिकीकरणाचा पुरस्कार करणाऱ्या अमेरिका-युरोपातूनच घेण्यात आलेले आहेत. 'बुरसटलेल्या, संकुचित मनाच्या, नतद्रष्ट राष्ट्रवादी व समतावादी भारतीयांनी' घेतलेले नाहीत हे लक्षात ठेवले पाहिजे.

भारताच्या दृष्टिकोनातून जागतिकीकरणाकडे पाहिले तर काय दिसते ? वरील आक्षेपातून एक मुद्दा पुढे आला आहे की विकसनशील किंवा अविकसित देशास जागतिकीकरणाचा फायदा होत नाही. तो मुख्यतः होतो अतिश्रीमंत व श्रीमंत देशांना. खुले आर्थिक धोरण व बाजारपेठीय तत्व केव्हाही सबल व श्रीमंत देशांनाच उपकारक ठरणार हे सिद्ध करण्याची गरज नाही. जागतिकीकरणा याच धोरणावर, तत्वावर आधारलेले आहे किंवा या धोरणाचा परिणाम आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत येणारा एक मोठा अडथळा होता, सोव्हिएट युनियनचा व त्याच्या मित्र राष्ट्रांचा. तो दूर झाल्याबरोबर सर्व जगावर साम्राज्य स्थापन करू पाहणाऱ्या अमेरिकेचे फावले आहे. अमेरिका शक्यतो, जमेल तेवढा स्वतःचा किंवा स्वतःच्या कंपूचा हितसंबंध पुढे रेटते. काही बाबतीत, काही प्रसंगी युरोपशी व जपानशी हातमिळवणी करते. हे तीन गट जागतिकीकरणाच्या गोंडस शीर्षकाखाली आपले आर्थिक साम्राज्य वाढवितात. या प्रकरणात भारत किंवा भारतासारख्या गरीब देशांना जबर किंमत देणे भाग पाडले जाते. हे सर्व अपरिहार्य आहे म्हणून आपण हताशपणे सहन करतो, जगातील सर्व देश समान असते, त्यांची परिस्थिती सारखी असती तर जागतिकीकरणाचा काही एक फायदा सर्व देशांना झाला असता. पण विषम जगावर जागतिकीकरण लादणे म्हणजे गरीब देशांच्या हितास बाधा आणणे होय हे आपण ध्यानात घेतले पाहिजे. जागतिकीकरण याचा अर्थ भारत किंवा तत्सम देशांनी राष्ट्रवादास सोडचिठ्ठी देणे आणि अमेरिका व जपानसारख्या देशांनी स्वतःच्या देशाचे हित संभाळणे. जागतिकीकरणामुळे राष्ट्रवाद ही श्रीमंत राष्ट्रांची मक्तेदारी झाली आहे. भारतास, श्रीलंकेस किंवा बांगला देशास राष्ट्रवादावर विश्वास ठेवण्यास परवानगी नाकारण्यात आली आहे. 'बी अमेरिकन बाय अमेरिकन' अशी घोषणा अमेरिकेस देण्याची मुभा आहे पण भारतात महात्मा गांधींची स्वदेशीची कल्पना मांडल्यास चेष्टा केली जाईल. अमेरिकेच्या काँग्रेसने व्यापाराबाबत केलेले कायदे जगातील सर्व देशांनी पाळावेत अशी अमेरिकेची अपेक्षा असते. नाहीतर या महान देशाचे अध्यक्ष गरीब देशांना, स्पर्धा करणाऱ्यांना, त्यांच्याशी टक्कर देणाऱ्यांना उघड धमकी देतात. कोणत्याही स्पर्धेतून मक्तेदारी निर्माण होते. जागतिकीकरणाच्या नावाखाली चाललेल्या जागतिक स्पर्धेत अमेरिका, जपान, जर्मनी यांची मक्तेदारी आकार घेते आहे. त्यांच्यात आपापसात थोडी स्पर्धा असू शकते पण सर्वांना त्या स्पर्धेत उतरण्यास वाव नाही. ज्यामुळे पर्यावरण बिघडेल, आरोग्यास धोका निर्माण होईल, घाण, दुर्गंधी होईल असे कारखाने गरीब देशांमध्ये उघडणे म्हणजे जागतिकीकरण. श्रीमंत देशातील औद्योगिक कचरा व टाकावू वस्तूंचे डोंगर गरीब देशात आणून टाकणे म्हणजे जागतिकीकरण. एनरॉन कंपनीच्या बाईंनी शरद पवार, बाळासाहेब ठाकरे, गोपीनाथ मुंडे यांच्यावर सारखाच प्रभाव टाकणे म्हणजे जागतिकीकरण. अशी व्याख्या जागतिकीकरणाची आपण केली पाहिजे. ज्या गरीब देशात मजुरीचे दर कमी आहेत व बेकारी जास्त आहे अशा देशातील कामगारांकडून उत्पादन करून घेऊन ते सर्व जगात वाटेल त्या किंमतीने विकणे म्हणजे जागतिकीकरण असेही म्हणता येईल. मध्य आशियातील पेट्रोलवर आपले वर्चस्व लादणे, तसे म्हटले तर जगातील सर्व साधनसंपत्ती व नैसर्गिक संपत्तीवर आपलाच हक्क आहे असे श्रीमंत देशांनी मानणे व तसा व्यवहार करणे असाही एक अर्थ जागतिकीकरणाचा आहे. मनमोहनसिंग यांच्यासारखे अर्थमंत्री जगातील वेगवेगळ्या देशांत नेमणे हाही एक प्रकार जागतिकीकरणात बसतो. जगातील सर्वांनी अमेरिकेत लोकप्रिय असलेले कपडे वापरावेत, तेथे प्रसिध्द असलेला सिनेमा पाहावा, तसाच गोळीबार करण्यास सर्वांनी शिकावे, त्यांच्याप्रमाणेच नाचावे, गावे, हसावे, बोलावे, हावभाव करायेत म्हणजे जागतिकीकरण असेही म्हटले तर चूक होणार नाही. आपण आपली संस्कृती, भाषा, चालीरीती, परंपरा, इतिहास विसरावा व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सामील व्हावे. आपल्याकडील 'योगा' व 'अधात्म्य' चवीपुरते त्यांनी घ्यावे व त्यांच्याकडे न खपणाऱ्या सिगरेटी इकडच्या लोकांना विकाव्यात असा देवघेवीचा हा सर्व प्रकार आहे. आपल्याकडील इंजिनिअरांनी अमेरिकेत गोऱ्यांपेक्षा कमी पगारात कामे करावीत व थोडेबहुत पैसे विश्व हिंदू परिषदेस द्यावेत असाही अर्थ जागतिकीकरणाचा सांगता येईल. त्यांनी 'गांधी' हा सिनेमा पाहावा व आपण

Scanned by CamScanner

'टर्मिनेटर' पाहावा हे जागतिकीकरणास अपेक्षित आहे. आपल्याकडून त्यांनी योग व आयुर्वेद चोरावेत व आपण त्यांच्याकडून हिंसा व सौंदर्य स्पर्धा. त्यांनी आपल्या मुलीला विश्वसुंदरी बनवावे व कोट्यावधी रुपयांची सौंदर्य प्रसाधने येथे खपवावीत आणि आपण 'राष्ट्राभिमानाच्या' दृष्टीने याकडे पाहावे असे जागतिकीकरण अमेरिका व इतर श्रीमंत राष्ट्रांना आपल्यावर लादायचे आहे. कोकणचा कॅलिफोर्निया करण्याचा प्रयत्नात गरीब लोकांचे आयुष्य बरबाद करणारे बहुराष्ट्रीय प्रकल्प कसे आणावेत व 'कोकणस्थांनी कॅलिफोर्नियात जाऊन सॉफ्टवेअरचा धंदा करावा असेही या जागतिकीकरणास अभिप्रेत आहे. ओरिसाच्या कलहंडी जिल्ह्यात किंवा महाराष्ट्राच्या मेळघाट भागात भूकबळी पडले तर त्याची बातमी वाचण्यापूर्वी हिलरी क्लिंटन यांनी कोणती नवी भानगड केली किंवा डायनाचे कपडे किती किंमतीत विकले गेले याची बातमी उपग्रहाद्वारे इकडे येऊन पोहचलेल्या संदेशातून कळणे म्हणजे जागतिकीकरण असे म्हटले तर वावगे होणार नाही. भारताच्या दृष्टीने पाहिल्यास जागतिकीकरणाचा हाच अर्थ होतो. पूर्वीपासूनच स्वतःच्या देशाचे परराष्ट्र धोरण पुढे रेटण्यासाठी आर्थिक बाबींचा (उदाहरणार्थ, आर्थिक मदतीचा) उपयोग करून घेतला जात असे. जागतिकीकरणामुळे एका बाजूने खुले जागतिक आर्थिक धोरण असे म्हणून तुम्हाला आंतराष्ट्रीय बाजारपेठेत आणायचे व तेथे ऐन वेळी स्वतःच्या राष्ट्रहितास प्राधान्य द्यायचे व तुम्हाला भीती घालायची, तुमच्यावर बंधने आणायची. किंवा याउलट आर्थिक हित सांभाळण्यासाठी मानवी हक्काचा मुद्दा पुढे करायचा, असले प्रकार उघडपणे चालू झाले आहेत. सीटीबीटीचा बागुलबुवा हा त्यातीलच एक प्रकार. तुम्हाला आर्थिकदृष्ट्या इतके अवलंबून राहायला लावायचे की तुम्ही त्यांची राजकीय मागणीही मान्य कराल असे हे त्यांचे जागतिकीकरणाच्या युगातील 'परराष्ट्र धोरण' आहे.

दोन राष्ट्रांचा सिध्दान्त असूनही आपण जागतिकीकरणाची री का ओढत आहोत ? त्याची अपरिहार्यता स्वतःला का पटवून देत आहोत ? त्याची चांगली बाजू रंगवून का सांगतो आहोत ? त्याच्या टीकाकारांची खिल्ली का उडवित आहोत. याचे उत्तर देणे आपल्याला जमते का ते पाहूया. आपल्या देशात, आपल्या राष्ट्रात दोन देश, दोन राष्ट्रे आहेत. एक आहे उच्चभ्रूंचे, श्रीमंतांचे, उद्योगपतींचे, व्यापाऱ्यांचे, व्यवस्थापकांचे, व्यावसायिकांचे, वृत्तपत्रकारांचे, डॉक्टरांचे, प्राध्यापकांचे, शास्त्रज्ञांचे. या सर्वांना जागतिकीकरण ही संधी वाटते आहे. त्याबरोबर येणारे खुले आर्थिक धोरण व खाजगीकरण त्यांना हवे आहे. त्यांच्या हिताचे आहे. त्याचा फायदा उठविण्याची क्षमता त्यांच्यात आहे. त्यांना हव्या असलेल्या वस्तू घेण्यासाठी त्यांच्याकडे पैसा आहे. बाजारपेठ त्यांना प्रिय आहे. पाश्चिमात्य पध्दतीचे जीवन त्यांना आवडते. त्यांच्याकडे काळा पैसा आहे. त्यांना गलेलठ्ठ पगार आहे. त्यांच्याकडे शेअर्स आहेत. जमीनजुमला, घरदार, गाडी, घोडा सर्व काही आहे. तरीही त्यांचा हव्यास कमी होत नाही. म्हणून त्यांना अमेरिकीकरणाची प्रक्रिया चालू राहावी असे वाटते. त्यांना समाजवादाबद्दल घृणा वाटते. देशभक्ती हा भावनेचा अतिरेक वाटतो. आपण गोरे नसूनही गोऱ्या लोकांप्रमाणे जगू शकतो याचे त्यांना अप्रूप वाटते. त्यांचे 'राष्ट्र' जागतिकीकरणाच्या लाटेत वाहून गेले तर त्यांना ते हवेच. उद्योगपती, व्यापारी, श्रीमंत शेतकरी, व्यवस्थापक यांच्या हितसंबंधात आता एकवाक्यता आली आहे. त्यांच्यात सहमती निर्माण झाली आहे. या सर्व वर्गांना, गटांना जागतिकीकरणाचे फायदे उठवायचे आहेत. म्हणूनच बहुतेक सर्व प्रमुख राजकीय पक्षांचे आर्थिक धोरण एकसारखे वाटू लागले आहे. काँग्रेस, भाजप व किमान समान कार्यक्रमावर आधारलेली संयुक्त आघाडी यांचे जागतिकीकरणाबाबतचे धोरण जवळजवळ सारखेच आहे. कारण या देशातील सत्ताधारी वर्ग - गटांचे हितसंबंध आज एकसारखे झाले आहेत व त्यांना जागतिकीकरण, खाजगीकरण त्यांच्या सोयीचे व फायद्याचे वाटते आहे. शरद जोशींसारखे लोक व धिरूभाई यांची युती झाली आहे. त्यांच्या युतीचा फायदा प्रशासक, व्यवस्थापक व व्यावसायिकांनाही होतो आहे. या सर्वांच्या दृष्टीने आज राष्ट्र महत्त्वाचे राहिलेले नाही. परदेशातील त्यांच्यासारख्या गटांशी त्यांची अदृष्य युती झाली आहे. बेट तयार करून त्यात राहायचे आहे. जनसामान्यांपासून दूर राहायचे आहे. म्हणूनच त्यांच्या बंगल्याभोवती उंच भींतींचे दगडी कुंपण असते. त्यांची स्वतःची खाजगी आरोग्य, वीज, पाणी, सुरक्षा, संचरण व्यवस्था असते.

Scanned by CamScanner

त्यामुळे त्यांना खाजगीकरण प्रिय आहे. सार्वजनिक गोष्टीवर 'कोणीही' हक्क सांगू लागतो हे त्यांना पटत नाही. राजकारण, राज्यसंस्था, प्रशासन, कल्याणकारी धोरण यामध्ये त्यांना तितका रस नसतो. काहीही झाले तरी आपले हित सरकारकडून संभाळले जाणार आहे अशी खात्री त्यांना वाटत असते. सध्याच्या अस्थिरतेची त्यामुळेच त्यांना काळजी वाटत नाही. त्यांना सरकार हवे असते जनतेच्या चळवळी दडपण्यासाठी. शांतता राखण्यासाठी. मागास जातीचे कमी शिकलेले नेते सत्तेवर आले म्हणजे त्यांची रेवडी उडविण्यात हे पुढे असतात. शेअरबाजार घोटाळे, कंपन्यांच्या ताळेबंदातील घोटाळे, परकीय चलन घोटाळे, बँक घोटाळे, काळ्या पैशातून केलेली लाचलुचपत, या सर्व गोष्टी स्वतः करून राजकारण्यांच्या भ्रष्टाचारावर तोंडसुख घेणारे महाभाग त्यांच्यामध्ये असतात. या सर्वांना जागतिकीकरण योग्य वाटते. राष्ट्र, त्याचे सार्वभौमत्व, राज्यसंस्था या घटकांनी नव्या युगाचा मंत्र शिकावा अशी त्यांची इच्छा आहे.

परंतु हे लोक, हे वर्ग म्हणजे काही भारत देश नव्हे, या देशात, या भूप्रदेशावर ९० ते १०० कोटींच्या आसपास लोक राहतात. त्यामध्ये या मंडळींची संख्या एका अलीकडच्या अंदाजानुसार असेल फार तर २० कोटी. या देशातील बहुसंख्य लोक गरीब आहेत. मागास व दलित जातीचे व आदिवासी आहेत. ते बेकार किंवा अर्धबेकार आहेत. ते अंगमेहनतीचे काम करतात. त्यांच्यात शेतमजूर, कामगार, असंघटित क्षेत्रातील मजूर, मच्छीमार, भूमिहीन शेतकरी, शहरातील झोपडपट्ट्यांत राहणारे यांचा समावेश होतो. यांचे एक राष्ट्र आहे. ज्याचा वरील २० कोटी उच्चभ्रूंच्या राष्ट्राशी संबंध आणून दिला जात नाही. जागतिकीकरणात गरीब देशातील उच्चभ्रू एक झाले आहेत व जनसामान्यांना आपल्या खेळात घेण्यास नकार देत आहेत बाजारपेठेचा हा खेळ आहे. बाजारपेठेत खरेदी-विक्री करू न शकणाऱ्या लोकांना या खेळात घेतले जात नाही. जागतिकीकरणाची जी लेखाच्या सुरुवातीस उल्लेखलेली विविध अंगे आहेत त्याचा काहीच उपयोग सामान्य जनतेला होणारा नाही. आपल्या देशातील पन्नास टक्के लोक निरक्षर आहेत. उच्चतंत्रज्ञान, गणकयंत्र, उपग्रहाद्वारे होणारे संदेशवहन, नव्या संशोधनाची ताबडतोब होणारी माहिती, विमानप्रवास, इंटरनेट, पेजर या गोष्टी त्यांच्या समजण्यापलिकडे आहेत व त्यांचा त्यांना उपयोगही नाही. धुलाईयंत्रे किंवा तत्सम यंत्रांचा त्यांचा कधीही संबंध येणार नाही. त्यांना त्यांच्या वर्षानुवर्षे चालू असलेल्या व्यवसायातून हद्दपार केले जाते आहे. त्या ठिकाणी बहुराष्ट्रीय कंपनीचा महाकाय प्रकल्प उभा राहत आहे. त्यांच्या जमिनी, त्यांची नैसर्गिक संपत्ती, त्यांचे व्यवसाय त्यांची जीवन जगण्याची पध्दत त्यांच्याकडून हिरावून घेऊन त्यांना असहाय्य करण्याचा घाट जागतिकीकरणाद्वारे घातला जात आहे. त्यांच्या कधी नव्हे इतके आता लक्षात आले आहे की आपला देश आहे, हे आपले राष्ट्र आहे. ही जमीन, ही भाषा व संस्कृती आपली आहे. म्हणून त्यांचा या सर्वांना बाधा आणणाऱ्या, त्यावर मर्यादा घालणाऱ्या त्यांना निरर्थक बनविणाऱ्या जागतिकीकरणास विरोध आहे, निदान असायला हवा. त्यांच्या बद्दलचे, त्यांच्या जमिनीबाबतचे किंवा नैसर्गिक संपत्तीबाबतचे निर्णय त्यांना विश्वासात न घेता घेतले जात आहेत. सरकारे बहुराष्ट्रीय कंपन्यांचा दावणीला बांधलेली असतात. खोटा प्रचार करण्यासाठी या कंपन्या कोट्यावधी रुपये खर्च करायला तयार असतात. यातून दूरगामी परिणाम करणारे महत्त्वाचे धोरण ठरविले जाते. की त्यायोगे तेथील सामान्य जनता आयुष्यातून उठेल व बहुराष्ट्रीय कंपनीस, तिच्या भारतीय बगलबच्च्यांना फायदा मिळेल. म्हणून सामान्य लोकांचा, दलित-मागास जाती, निरक्षर, अर्धशिक्षित, गरीब, आदिवासी, मजुरी करणाऱ्यांचा जागतिकीकरणास विरोध असायला हवा. त्यांनी त्यांच्या संख्येच्या जोरावर येथील संसदीय लोकशाहीचा फायदा उठवायला हवा. अर्थकारणावर त्यांचे वर्चस्व हवे. सत्तेच्या राजकारणात शिरून राज्यसंस्थेवर ताबा मिळविला पाहिजे. त्यायोगे अर्थकारणावर त्यांना प्रभाव टाकता येईल, ते त्यांच्या बाजूला वळविता येईल. अमेरिकेचे आक्रमण थोपविता येईल. भारत या राष्ट्राचे हित जपता येईल. या देशाची स्वायत्तता राखता येईल. ही स्वायत्तता राखली तरच येथील गरिबांची काहीतरी धडगत आहे. अन्यथा जागतिक भांडवलशाही त्यांना जीवनातून उठवेल. जागतिकीकरणाची प्रक्रिया गरिबांच्या विरूध्द जाणारी कशी आहे हे अलीकडेच प्रसिध्द झालेल्या जगातील उत्पन्नाच्या वाटपाबाबतच्या कोष्टकावरून आपल्याला लगेच कळेल.

या कोष्टकावरून ध्यानात येते की १९८० ते १९९० या दशकात गरिबांची गरिबी जास्त प्रमाणात वाढत चालली असून श्रीमंतांची श्रीमंतीही वाढत चालली आहे. १९९० ते २००० या दशकात गरिबांच्या वाट्याचे प्रमाण आणखी कमी होणार असे ह्याआधीच्या दशकाच्या आकडेवारीवरून वाटते. हीच वर्षे नेमकी जागतिकीकरणाची वर्षे आहेत. म्हणून गरीब राष्ट्रांतील गरिबांनी राष्ट्रवादाला सोडचिठ्ठी देणे घातक ठरेल. जागतिकीकरणाचा फायदा लाटणाऱ्या उच्चवर्गीय व उच्चवर्णीयांच्या सुरात सूर मिळविणे अंतिमतः तोटयाचे ठरेल. गरीब राष्ट्रांना व त्यातील गरिबांना राष्ट्र ही संस्था, ही संकल्पना, तिचे सार्वभौमत्व आता जास्तच महत्त्वाचे बनले आहे. तसेच राज्यसंस्था व तिच्यावरील नियंत्रणही अपरिहार्य बनले आहे.

जागतिकीकरणाचा एक पैलू आहे. समाजवादास कडवा विरोध. सार्वजनिक प्रयत्नास विरोध. कारण जागतिकीकरण खुल्या बाजारपेठीय अर्थकारणावर आधारलेले आहे. कोणत्याही समतावादास, पुनर्वाटपास, विरोध हे या धोरणाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे, भारतातील गरिबांना हे धोरण परवडणारे नाही. भांडवलशाहीची समीक्षा करण्यास अजूनही समाजवादाची गरज आहे हे विसरता कामा नये. तसेच समाजवादातून समतावादच त्यांचे जीवन सुसह्य करू शकणार आहे. गोऱ्या देशातील, विकसित देशातील लोकांना समाजवाद नकोसा झाला असेल पण काळ्या, तपकिरी लोकांना, आशिया, आफ्रिका खंडातील गरीब देशातील जनतेला समाजवादच तारणार आहे. अर्थव्यवस्थेवरील उच्चवर्गीयांची व उच्चवर्णीयांची पकड सैल करण्यास, या वर्गांकडील उत जाणारी संपत्ती काढून घेण्यास, कल्याणकारी व सामाजिक सुरक्षावादी कार्यक्रमास प्राधान्य देण्यासाठी, आवश्यक गरजा पुरविणाऱ्या वस्तूंचे उत्पादन करण्यास अग्रक्रम देण्यासाठी समतावादास पर्याय नाही. जेव्हा पाचव्या, सहाव्या व सातव्या दशकात राज्यसंस्थेच्या आधाराची, सहाय्याची, उत्तेजनाची गरज होती, तेव्हा समाजवादाच्या नावाने या देशातील भांडवलशाहीने राज्यसंस्थेचा आश्रय घेतला. आज जेव्हा या कुबड्यांची स्वतःच्या वर्गाला गरज नाही तेव्हा राज्यसंस्था व समाजवादास शत्रू ठरविण्याचा प्रकार चालू झाला आहे, जागतिकीकरणाच्या आवरणाखाली.

राजेंद्र व्होरा.
विजयश्री अपार्टमेंट, प्रभात रोड,
एरंडवणे, पुणे - ४११ ००४

हार्दिक शुभेच्छा

स्टेशनरी
आणि ड्रॉईंग मटेरिअलचे
किरकोळ व ठोक व्यापारी

जैन ट्रेडिंग कंपनी

१६४६, टिळक रोड,
पुणे - ४११ ०३०
दुरध्वनी : ५३०६७४

Scanned by CamScanner